# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk2a@dte org.in Internet :http/www.dte.org.in


अधिसूचना

क्रमांक: २अ/एडीएम/अभियांत्रिकी/२०१३/१७८०

दिनांक : 12 DEC 2013

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता राज्यातील चार वर्षे कालावधीच्या अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र अभ्यासक्रमाचें प्रथम वर्षाचे प्रवेश केंद्र शासनाच्या वतीने घेण्यात येणा-या राष्ट्रीय पातळीवरील JEE-Main {Paper I } च्या आधारे करण्यात येणार असून या संबंधीचा महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक ३१.१०.२०१२ रोजी निर्गमित झालेला असून प्रवेशोच्छुक विद्यार्थी व पालकांच्या माहितीकरिता संचालनालयाच्या **http://www.dtemaharashtra.gov.in/fe2014** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तदनुसार राज्यातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणा-या **सर्व उमेदवारांना राष्ट्रीय स्तरावरील JEE {Main} परिक्षा देणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र शासना मार्फत MT-CET परीक्षा घेण्यात येणार नाही, हयाची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

JEE {Main} परीक्षेकरिता अर्ज फक्त Online पध्दतीनेच स्वीकारले जातील व Online अर्ज भरण्याची प्रक्रिया १५ नोव्हेंबर २०१३ पासून सुरु असून **२६ डिसेंबर २०१३ ही शेवटची तारीख** आहे. अर्ज भरण्याकरिता ८ दिवस शिल्लक आहेत. प्रवेशोच्छुक उमेदवारानी व त्यांच्या पालकांनी याची नोंद घ्यावी. अर्ज करण्याबाबतची सविस्तर माहिती **www.jeemain.nic.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. या बाबीची सर्व प्रवेशोच्छुक उमेदवारानी नोंद घ्यावी. प्रवेशासंबंधी सर्व माहिती वेळोवेळी या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

(डॉ. सुभाष महाजन)

प्र.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

C:\Documents and Settings\desk2a\Desktop\jee-main-2014-15 -2.doc